**MS-CIT**
आंतरराष्ट्रीय दर्जाचा परिपूर्ण कंप्यूटर कोर्स

# Model Answer
## Set- III
**Std. – 10th MM/Semi**
**Subject – Geography**

MKCL KLiC Courses
Gateway to Knowledge Lit Careers

**प्र.१ दिलेल्या पर्यांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१) ब्राझील या देशाचे स्थान पश्चिम गोलार्धात दक्षिण अमेरिका खंडाच्या उत्तर भागात आहे.
२) ॲमेझॉनच्या खोऱ्यात सुमारे २००० मिमी पाऊस पडतो.
३) भीमा नदीवर बांधलेल्या जलाशयाचे नाव उजनी आहे.
४) ब्राझीलिया हे राजधानीचे शहर पर्यटकांचे आकर्षण आहे.


**प्र.२ योग्य जोड्या जुळवा.**

१) मसाल्याचे पदार्थ – भारत
२) दगडांच्या खाणी – आंध्रप्रदेश
३) २६ घटकराज्ये असलेला देश – ब्राझील
४) बंगालचा वाघ – पश्चिम बंगाल

**प्र.३ चूक की बरोबर सांगा व चुकीची विधाने दुरूस्त करा. (कोणतेही चार)**

१) चूक. कुलाबा हा सागरी किल्ला म्हणजेच जलदुर्ग आहे.
२) बरोबर
३) बरोबर
४) चूक. ब्राझील देशाला दक्षिण अटलांटिक महासागराचा किनारा लाभलेला आहे.
५) बरोबर.

**प्र.४ अ) दिलेल्या भारताच्या नकाशा आरखड्यात पुढील घटक दाखवा. (कोणतेही चार)**




**आ) दिलेल्या आकृतीचे वाचन करून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१) ॲमेझॉनचे खोरे गियाना उच्चभूमी आणि ब्राझील उच्चभूमीच्या दरम्यान आहेत.
२) पिको दी नेब्लीना शिखराची उंची ३०१४ मीटर आहे.
३) ब्राझीलच्या उत्तरेला माराजॉ हे बेट आहे.

४) ब्राझीलच्या नैऋत्येकडे ॲमेझॉन नदी आहे.

५) अजस्त्र कडा ब्राझीलच्या पूर्वेकडील भागात आहे.

६) अटलांटिक महासागरास सावो फ्रान्सिस्को नदी मिळते.

**प्र.५ भौगोलिक कारणे लिहा. (कोणतेही दोन)**


१) १) भूरचनेमुळे ब्राझीलच्या पर्जन्यात फरक पडतो. २) विषुवृत्तीय प्रदेशात बहुतांश भागात वर्षभर पाऊस पडतो. ३) सागर किनाऱ्यापासून जसजसे दूर जावे तसे पर्जन्याचे प्रमाण कमी होते. ४) अजस्त्र कडा उच्च भूमीच्या पूर्वेकडे आहे त्यामुळे वारे येथेच अडविले जातात व तेथे पाऊस जास्त पडतो. ५) उच्चभूमीच्या पलीकडे या वाऱ्यांचा प्रभाव कमी होतो. म्हणून ब्राझील देशातील उच्चभूमीच्या ईशान्य भागात पाऊस अतिशय कमी पडतो.

२) १) सागरी मार्ग आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी खूप महत्त्वाचे असतात. २) जलवाहतूक कमी खर्चात होते, जलमार्ग बांधावे लागत नाहीत. ३) खनिजे, अवजड यंत्रसामग्री, कोळसा, धान्ये इ. वजनाने जड असलेल्या मालाची वाहतूक जलमार्गाने करणे सोयीचे असते. ४) विसाव्या शतकातील तांत्रिक विकासामुळे स्वयंचलित जहाजे बांधण्यात आली. ५) जहाजांवर शीतगृहे व इतर सोयी असल्यामुळे नाशिवंत वस्तूही दूरदूरच्या देशात पाठविणे सहज शक्य झाले. म्हणून आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी सागरी मार्गावर अवलंबून राहावे लागते.

३) १) भूगोल या विषयामुळे आपणास विविध भूरूपे, मृदा, वनस्पती, हवामान, खनिजे, प्राणी इ. नैसर्गिक घटकांची माहिती होते. २) व्यवसाय, संदेशवहन, वाहतूक, सांस्कृतिक घटकांची (मानवनिर्मित) माहिती मिळते. ३) एखाद्या स्थळाची किंवा प्रदेशाची माहिती पुस्तके व नकाशे यातून मिळते. पण ही माहिती अप्रत्यक्षपणे मिळवलेली असते. ४) एखाद्या क्षेत्रास भेट देऊन आपणांस प्रत्यक्ष ज्ञान मिळते. ५) नकाशात दाखविलेल्या प्रदेशाची आपण केवळ कल्पना करू शकतो. परंतु क्षेत्रभेटीतून तेथील वस्तुस्थिती समजते. ६) प्राकृतिक व सांस्कृतिक घटकांचा सहसंबंध लक्षात येतो.

४) १) भारत हा देश नैसर्गिकदृष्ट्या वैशिष्ट्यपूर्ण आहे. २) भारतातील निसर्ग समृद्धता, आकर्षक भूदृष्ये, उत्तुंग हिमालय, रमणीय सागरकिनारे पर्यटकांना आकर्षित करतात. ३) भारतातील हिमालयात जवळ जवळ एक दशलक्ष पर्यटक दरवर्षी पर्वतारोहण, जंगलातील प्राणी पाहण्यासाठी येतात. ४) सुंदर समुद्रकिनाऱ्यावर सुद्धा भारतात अनेक पर्यटक येतात.

**प्र.६ अ) दिलेल्या माहितीवरून बहुरेषालेख काढा व खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**




१) ब्राझील देशाचे साक्षरतेचे प्रमाण जास्त आहे.

२) २०१६ साली भारतातील साक्षरतेचे प्रमाण जास्तीत जास्त ७.२.२ होते आणि १९८१ साली ब्राझीलमधील कमीत कमी प्रमाण ७४.६ होते.

३) १९८१ ते २०१६ मध्ये भारत देशात साक्षरतेच्या प्रमाणात जास्तीत जास्त ३०% वाढ झालेली आहे.

**किंवा – आ) खालील आकृतीचे वाचन करून दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१) १९६१ साली १८.० टक्के नागरीकरण होते.

२) १९७१ ते १९८१ या दशकात नागरीकरण सर्वाधिक होते.
३) १९६९ ते १९६१ या दशकात नागरीकरणाची वाढ अतिशय कमी होती.
४) २०११ साली ३१.२% टक्के नागरीकरण झाले होते.
५) वरील आलेखात पाच दशकांचे नागरीकरण दर्शविले आहेत.
६) वरील आलेखाचा रेषालेख प्रकारचा आहे.

**प्र.७ खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)**

१) इलेक्ट्रॉनिक्स माध्यमांच्या प्रगतीमुळे दूरसंचार हे अतिशय वेगाने वाढणारे क्षेत्र बनले आहे. माहिती तंत्रज्ञान आणि संदेश वाहनाच्या युगात संगणकाचा वापर वाढला आहे. भ्रमणध्वनी, इंटरनेट अशा डिजिटल साधनांच्या वाढत्या प्रभावामुळे संदेशवाहन गतिमान झाले आहे. संदेशवहन गतिमान होण्यासाठी खालील साधनांचा सहभाग आहे – १) दूरध्वनी, भ्रमणध्वनी, आकाशवाणी. २) संगणक व इंटरनेट. ३) माहिती तंत्रज्ञान. ४) कृत्रिम उपग्रह. ५) डिजिटल साधनांना वाढत्या प्रमाणामुळे संदेशवहन होय.

२) **वन्य प्राणीजीव:** १) भारतात व ब्राझीलध्ये वन्य प्राण्यांच्या अनेक प्रजाती आपणास दिसून येतात. २) दलदलीच्या प्रदेशात ॲनाकोंडा आढळतो. ३) मगरी, सुसरी, माकडे, प्युमा व बिबट्या आढळतो आणि भारतात नद्या, खाड्या व किनाऱ्यावरील प्रदेशात कासव, मगर, सुसर, इत्यादी प्राणी आढळतात. ४) ब्राझीलमध्ये कोंडोर हा खूप उंचावर उडणारा मोठ्या आकाराचा पक्षी, विविध प्रकारचे पोपट, मकाव व फ्लेमिंगो या पक्षाच्या प्रजाती आढळतात. ५) येथे लक्षावधी प्रकारचे कीटक सुद्धा आढळतात. या विविधतेमुळे ब्राझीलमधील वन्य जीवन अतिशय समृद्ध आहे. ६) तर भारतात मोर, खंड्या, तितर, कबुतरे, विविधरंगी पोपट, पाणथळ जागी बदके, बगळे व गवताळ प्रदेशात माळढोक सारखे पक्षी आढळतात. ७) भारत हा वैशिष्ट्यपूर्ण वन्यप्राणी असलेला देश म्हणून ओळखला जातो.

**नैसर्गिक वनस्पती:** १) भारतात सरासरी २००० मिमी जास्त पर्जन्यमान होतो. २) भरपूर सूर्यप्रकाश असलेल्या भागात सदाहरित वने आढळतात. २) तर ब्राझीलमध्ये वर्षभर पाऊस पडतो तसेच विषुववृत्तीय वने आढळतात. ब्राझीलमध्ये ज्या प्रदेशात पाऊस ठराविक काळात पडतो तसेच वृक्षांची घनता कमी होत जाते. त्या ठिकाणी गवत, खुरटी झुडपे व काटेरी वनस्पती आढळतात. ३) भारतात ज्या भागात दीर्घकाळ कोरडा उन्हाळा व ५०० मिमी पेक्षा कमी पर्जन्य होतो तेथे काटेरी वनस्पती आढळतात. ४) त्यात खैर, बाभूळ व खेजडी वृक्ष आढळतात. ब्राझीलमध्ये सदाहरित, निमसदाहरित, शुष्क इ. वनस्पतींचा समावेश होतो. ५) भारतात पानझडी वृक्ष, काटेरी वनस्पती, दलदलीच्या प्रदेशात भारतात समुद्रकाठची वने, सुंद्रीची वने व खारफुटीची वने आढळतात.

३) **साम्य:** १) भारत व ब्राझील या देशाला अनुक्रमे ७५०० किमी व ७४०० किमी लांबीचा सागरी किनारा लाभलेला आहे. २) ब्राझील देशाला दक्षिणपूर्व दिशेला अटलांटिक महासागर लाभलेला आहे. ३) भारताला अरबी समुद्र, बंगालचा उपसागर हा किनारा लाभलेला आहे. ४) दोन्ही देशांमध्ये मासेमारी हा व्यवसाय परंपरेने चालत आलेला आहे. ५) दोन्ही देशांमध्ये मासेमारीचा उपयोग अन्नधान्य पुरवठा, रोजगार निर्मिती, पोषणस्तर, परकीय चलन मिळवण्याकरिता होती.

**फरक:** १) भारतामध्ये पूर्व दिशेला नदीच्या गोड्या पाण्याची मासेमारी केली जाते. उदा. गंगा नदी (पश्चिम बंगाल) देशाच्या एकूण मत्स्य व्यवसायांपैकी जवळजवळ ६०% वार्षिक उत्पादन हे गोड्या पाण्याच्या मासेमारीतून मिळते. २) परंतु ब्राझीलमध्ये नदीच्या पात्रात मासेमारी करण्यावर मर्यादा येतात. कारण ब्राझीलची प्रमुख नदी ॲमेझॉन व तिच्या उपनद्या यांच्या पाण्याच्या वेग जास्त असतो तसेच ब्राझीलमधील प्राकृतिक रचना, घनदाट वने दुर्गमता इत्यादी कारणांमुळे नदीच्या किनारी मासेमारी क्षेत्र विकसित होऊ शकत नाही. ३) भारतात मासेमारीच्या एकूण वार्षिक उत्पादनापैकी सागरी मासेमारीचा वाटा ४०% आहे. ४) भारताच्या गोड्या पाण्याच्या मासेमारीत रोहू, कटला, चोपडा इत्यादी प्रमुख मासे आहेत. ५) भारतातील खाऱ्या पाण्यातील मासेमारी प्रामुख्याने अरबी समुद्र व बंगालच्या उपसागरात केली जाते.

अरबी समुद्रातील मासे – वशी, बांगडी, बोंबील, सुरमई, झिंगे, पापलेट इत्यादी.

बंगालच्या उपसागरांतील मासे – शेवडे, लंबी चकी (क्लू पिड्स) रावस इत्यादी

ब्राझीलमध्ये दक्षिण-पूर्व अटलांटिक किनाऱ्यालगत प्रामुख्याने स्वीर्ड, कोळंबी, लॉबस्टर, सार्डिन इत्यादी जलचरांची मासेमारी केली जाते.